Volume - 5 (2025)
Issue - 1 (December)
LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science
ISSN
2583-2549

# शैक्षणिक ग्रंथालय संगणकीकरण एक आधुनिकतेकडे वाटचाल

**प्रा. डॉ. गव्हाणे महारुद्र प्रभू**
ग्रंथपाल
श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी. ता. गेवराई. जि. बीड -४३११४३
M.No. 9881351264

---

***सारांश :*** *"नॅकच्या निकषानुसार ग्रंथालयाचे संगणकीकरण करणे अनिवार्य आहे. त्यामुळे विद्यमान ग्रंथपालाना नॅकला सामोरे जाताना नॅकची टिम ग्रंथपालांना विचारना करते, कि ग्रंथालयात कोणती आज्ञावली (सोफ्टवेअर) आहे. विद्यार्थ्यांना ग्रंथालयांमार्फत कोणत्या सुविधा दिल्या जातात. इंटरनेटची सुविधा आहे का, नियमीत ग्रंथालयात किती विद्यार्थी येतात, किती ग्रंथ ग्रंथालययातून दररोज दिले जातात अशा प्रश्नांना सामोरे जावे लागते.म्हणून ग्रंथालयाचे संगणकिकरण करणे आवश्यक आहे. ग्रंथालयाचे दैनंदिन कामकाज, सेवा, व्यवस्थापन इत्यादि सर्वच अंगाचा विचार करता ग्रंथालयाचे संगणकीकरण महत्वाचे आहे. तसेच वाचकांना उत्तम, दर्जेदार व कमीत कमी वेळात सेवा देण्यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण गरजेचे झाले आहे. ग्रंथखरेदी, त्यावरील प्रक्रिया, देवघेव यामध्ये आता अमुलाग्र बदल झालेले आहेत. माहितीचा ओघ प्रचंड आहे. या माहिती स्त्रोतांचा वाचकांना जलद उपयोग व्हावा म्हणून आपण काळाबरोबर जाणे आवश्यक आहे. इंटरनेटवरील सेवा वाचकांना देता याव्यात म्हणून ग्रंथालयाचे संगणकीकरण करणे व आधुनिकतेबरोबर जाणे ग्रंथालायाला गरजेचे आहे.*

**संकेतशब्द/शोधशब्द :** शैक्षणिक ग्रंथालय,संगणकीकरण,आधुनिकीकरण आज्ञावली (सॉफ्टवेअर).

---

**प्रस्तावना :**

एके काळी ग्रंथालयातील विशेष ग्रंथाचा संग्रह हा भूषणावह व प्रतिष्ठेचा होता परंतू आता ग्रंथालयातील " विजीय स्त्रोत' हा विशेष ग्रंथसंग्रह म्हणून प्रमुख वाचन साहित्य घटक झाला आहे. या साहित्याच्या साठवणीस फारच कमी जागा लागते आणि याचे सहज व कमी वेळात हस्तांतरण करता येते. छापील साहित्यापेक्षा ग्रंथालयात वाढत जाणाऱ्या अंकीय ग्रंथामुळे आणि नियतकालिकांमुळे ग्रंथालयाची एकविसाव्या शतकाकडे झपाट्याने वाटचाल होत आहे. कन्शॉरशियाच्या सभासदस्यत्वामुळे वाचकांना असंख्य नियतकालिके, माहिती संचयिका, अंकीय वाचन साहित्य हे शोधासाठी आणि संदर्भासाठी सहज उपलब्ध होत आहे.

याची सुरुवात ग्रंथालयात अंकीय साहित्य विभागाची निर्मिती करून झाली पाहिजे. हळूहळू मूलभूत

सेवात वाढ, सुधारणा, नवनवीन तंत्रज्ञानाचा अंगीकार यांच्याद्वारे हा विभाग समृद्ध केला जाईल. या विभागात येणाऱ्या नव्या साहित्याचा उपयोग दिवसेंदिवस वाढता राहील. संस्था पुराभिलेख अंकीय स्वरूपात रूपातर करून या विभागाची सुरुवात कण्याची एक उत्कृष्ट कल्पना प्रत्यक्षात आणता येईल. अशा या वाचन साहित्याची संगणक्रस्थानावरील उपलब्धी विद्यापीठ परिसरातच नव्हे तर परिसराबाहेर म्हणजे चार भितीच्या पलीकडे जाऊन अंतराच्या मर्यादेत न राहता दिवसाचे चोवीस तास, आठवड्याचे सातही दिवस दूरस्थ वाचकाना याचा लाभ होईल.

**शैक्षणिक ग्रंथालय संगणकीकरण एक आधुनिकतेकडे वाटचाल :**

एकविसावे 'शतक' या शब्दप्रयोगात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या प्रवेशाने ग्रंथालयातील वातावरणात झालेला बदल अभिप्रेत आहे.माहितीची| ज्ञानाची निर्मिती, संकलन, संघटन, संस्करण आणि वितरण या विद्वत जगातील मूलभूत प्रक्रियात 1980 पासन सतत बदल होत आहेत. माहिती आणि जानाची नोंद, जपणूक आणि वितरण यांच्या माध्यमातही बदत झाले ला आहे. ग्रंथालयाच्या या माहिती आणि संप्रेषण तंत्र ज्ञानाधारित ग्रंथालय आधुनिकीकरणातील टप्यामुळे वाचन साहित्याचा पुरेपूर वापर, वाचकांना ग्रंथालय प्रवेशाबरोबरच वाचन साहित्याची सूचीय माहिती आणि त्याचबरोबर पूर्ण वाचन साहित्यही मिळत आहे, हा आहे दृष्य परिणाम. ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह साठवण, ग्रंथालयातील वाचन साहित्याच्या प्रकारानुसार वेगवेगळे विभाग,ग्रंथसंस्कार, कार्याचा/ कामाचा ओघ, कर्मचारी, वाटप संहिता यांतही या नव्या तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून पाहणे आता गरजेचे आणि आवश्यक आहे. ग्रंथालय त्यवस्थापन आता पुर्वीपेक्षा जास्त गुंतागुंतीचे झाले आहे. एकविसाव्या शतकातील शैक्षणिक ग्रंथालय हे आपल्या वाचकांच्या सेवेसाठी वरील सर्व बदलास स्वीकारणारे, बदलाशी एकरूप होणारे ज्यात ग्रंथालय संघटक, ग्रंथालयाच्या सेवा घेणारे वाचक, वाचकेतर आणि ग्रंथालय कर्मचारी, इत्यादी येतात.

**(अ) ग्रंथालयासाठीची संगणक प्रणाली / आज्ञावली :**

ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणाचा, संगणकीकाणाचा विचार प्रगत दृष्टिकोनातून करताना त्याची सुरुवात होते ती संगणक क्षेत्रातील तज्ज मंडळी असल्याने ग्रंथालयांसाठी संगणक महाविद्यालयांत स्वतंत्र असा संगणक विभाग आता अनिवार्य झाला आहे. या प्रणाली /आज्ञावली ही संस्थांतर्गत विकसित केली जाते. यात ग्रंथालय सेवकांचा आज्ञावलीची निवड करणपयापासून ते ग्रंशालयांना आणि ग्रंपालांना या क्षेत्रातील सर्व गरजा पुर्ण करू शकत नाही. अखेर या अपुर्या आणि अकार्यक्षम अशा कार्यांनी त्याची सुरवात होते. ती ग्रंथालयांसाठी उपयुक्त अशा संगणक प्रणालीला घातक ठरते. जाळयावर उपलब्ध असणाऱ्या विनामूल्य आज्ञावलीपैकी या योग्य व्यावसायिक मार्गदर्शन उपलब्ध नसल्याचे आढळून येते.

(1) संगणकाचा वापर हा अत्याबश्यक भाग असल्याने बऱ्याच विद्यापीठांत अणि संस्थांतर्गत विकसित आज्ञावली चांगल्या असल्या तरी त्यात ग्रंथालयांच्या वाढत्या मागण्या, बदलती व्यवस्था, तंत्रजानानुसार वेळोवेळी सुधारणा केलेल्या नसल्याने अनेक व्या उपक्रमात त्याचा वापर करता येत

Volume - 5 (2025)
Issue - 1 (December)
LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science
ISSN
2583-2549

नाही. उदाहरणार्थ, "दंडसंकेत' (बारकोड) हा पुस्तक देवघेवीसाठी एकच पर्याय जर आज्ञावलीत नसेल तर बदलत्या काळात ही आज्ञावली या कामासाठी वापराता येत नाही.

(2) ग्रंथालयांची संगणकीय जाळी स्थापन झाल्यावर् जाळयाच्या सभासदाना ग्रथालयाची संगणक आज्ञावली मोफत वा अगदी नाममात्र किमतीत दिली जाते. आज्ञावलीचाच उपयोग करावा लागतो. या ठिकाणी व्यवस्थापनाची आवश्यकता पुर्ण करण्यास त्यांना अडचणी येतात.याशिवाय अशा आज्ञावली वापरताना उद्धवलेल्या अडचणीवर योग्य उपाययोजना, विक्री पश्चात सेवा या संगणक जाळीचे निर्माते सुरूवातीस जरी व्यावसायिक संस्थेपेक्षा या आज्ञावलीसाठी वेशेष परिश्रम घेत असले तरी सहभागी ग्रंथालयांच्या वैयक्तिक गरजा, व्यावसायिक तत्त्वावरच्या ग्रंथालयाच्या आज्ञावली या त्याच्या विक्री कौशल्याबर बाजारात आणल्या जातात. या जरी सर्वसमावेशक, गुणवत्तापूर्ण असल्या, तरी ग्रंथालयात संगणकीकरण करताना ते जसे जमले तसे करत गेले तर असंख्य अडचणी उद्धवून अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. यासाठी त्याची पध्दतशीरपणे रचना आखायला हवी. त्या दृषीने सर्व प्रकारची परिपूर्ण माहिती उदाहरणांसह सोप्या भाषेत ग्रंथात दिली आहे.

(3) मुळात संगणकीकरण हा शब्द आधुनिकीरणास समानार्थी असल्याप्रमाणे वापरला जातो. त्यातील सूक्ष्म फरक या ग्रंथाच्या अवलोकनाने लक्षात येतो. या दोन्हींचें महत्व दर्शवणारे दोन विभाग या ग्रंथात आहेत. पहिल्या विभागातील सात व दुसऱ्या विभागातील तीन अशी एकूण दहा प्रकरणे ग्रंथालय संगणकीकरणाशी "तर दुसऱ्या विभागातील तीन प्रकरणे आधुनिकीकरणाशी निगडीत आहेत.

(4) पहिल्या विभागात संगणकाची व्याख्या, पार्श्वभूमी, तांत्रिक माहिती, आज्ञावली, बारकोड तं तंन, डेटाबेस, संगणकीकरणाचे फायदे, पध्दतींचा (sysiems) विकास, सोल व इतर पॉफ्टवेअर, संगणकीकृत कार्ये, नेटवर्कींग, इंटरनेट, संकेतस्थळ निस्चीती, डिजिटल ग्रंथालय अशा अनेक विषयांचा परामर्श घेतला आहे. दुसऱ्या विभागात आधुनिकीरकरणाशी निगडीत मूलभूत गोटींची चर्चा करण्यात आली आहे त्यात ग्रथालय सुरक्षितता, ई - गव्हर्न्समध्ये वापर, त्यासाठी उपयुकत आज्ञावली अशा विषयांचे विवेचन करण्यात आले आहे तसेच विषयांशी संबंधित अशा 'माहिती साक्षरता' या घटकाचीही सखोल ओळख करुन देण्यात आली आहे. संगणकीकरण हा आजकालचा परवलीचा शब्द झाला आहे. माहिती तंत्रज्ञान झपाट्याने विकासित होणारे तंत्रज्ञान आहे या दोन्हींशी ग्रंथालयाचा जवळचा संबंध आहे. याच्या वापराबाबतही ग्रंथालयांनी या दोन्हींना प्राधान्यता दिलेली आहे.

मात्र वापर करण्याच्या पध्दतीबाबत मतभिन्नता आढळते तसेच अनेक पर्यायंच्या उपलब्धतेमुळे गोंधळात केव्हाही भर पडते. यावर इग्रजी भाषेतील पुस्तकांची मात्रा लागू पडते. पण त्यालाही मर्यादा आहेत. अशा स्थितीत संगणकीकरण विषयक अनेक प्रश्नांची उत्तरे देणारा डॉ. द. ना. फडके लिखित "ग्ंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण' हा ग्रंथ नुकताच प्रकाशित झाला आहे डॉ, द.ना. फडके हे सेंट्रल

लायब्ररी, भारतीय प्रोद्योगिकी संस्था, मुंबई येथे वरिष्ठ सहाय्यक ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत ग्रंथालयशास्त्रात भौगोलिक माहितीचा ग्रंथालयात वापर' या विषयावर प्रबंध सादर करुन त्यानी पुणे विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवली आहे यशवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अलगप्पा विद्यापीठ, भारती विद्यापीठ, यांच्यासाठी अभ्यासक्रम निर्मिती, पाठ्यपुस्तक लेखन व संमत्रण कार्यात त्यांचा मोठा सहभाग आहे, एम.फिल, पीएच. डी च्या विदयार्थ्यांना मार्गदर्शक म्हणूनही त्यांचा आधार लाभत आहे. शिकवण्याचा प्रत्यक्ष अनुभव, ग्रंथालय संगणकीरकरणातील सहभाग, लेखन सहकार्य, तसेच नवनव्या उपक्रमाचे आयोजन असा दिर्घ अनुभव असलेल्या विदयार्थीप्रिय डॉ.द ना. फडके यांचे लेखन हे या ग्रंथाला निराळीच उंची प्रात करुन देते. म्हणूनच हा मातृभाषेतील व या विषयाचा सर्व अंगानी ऊहापोह करणारा पहिलाच ग्रंथ आहे असे म्हटल्यास वावगे नये. ग्रंथालयात संगणकीकरण करताना ते जसे जमले तसे करत गेले तर असंख्य अडचणी उद्भवून अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. यासाठी त्याची पध्दतशीरपणे रचना अखायला हवी.त्या दृष्टीने सर्व प्रकारची परिपूर्ण माहिती उदाहरणांसह सोप्या भाषेत या ग्रंथात दिली आहे.

**समारोप :**

पारंपारिक ग्रंथालय व्यवस्थेतन एकविसाव्या शतकाला साजेसा अत्याधुनिक बदल घडवून आणण्याची जबाबदारी ही त्या-त्या शैक्षणिक ग्रंथालयाची आहे. वाचकांना उत्तम दर्जेदार अल्प वेळात सेवा देण्यासाठी ग्रंथालयांना फार मोठ्या प्रमाणात पूर्वतयारी करावी लागणार आहे हे काम व्यवसायिक स्वरूपाचे आणि तंत्रज्ञानाशी निगडित आहे इटरनेटवरील माहिती सोत हे सर्वासाठी सेवेस तयार आहेत. असेअसले तरी इंटरनेटवर आधारित सेवा ग्रंथालयाच्या माध्यामातूनच चागल्या व परिपुर्ण देता येतात. सूचीय आणि संदर्भ सेवेत नेमकेपणा आणि कालबद्धता आणणे. संगणक जाळयावर काही अतिशय उपयुक्त व्यावसायिकाची स्थाने आहेत. त्याचा शोध घेऊन माहितीचे संघटन आणि वितरण करणे ही कोशल्ये ग्रंथालय व्यवसायिकांकडे असतात. शैक्षणिक ग्रंथालय आधुनिकीकरणाचा मागोवा घेताना असे दिसून आले की, ग्रंथालयांनी समकालीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून काळाच्या पुढे जाण्याचा प्रयास केला आहे. परंतु आताचे बदल हे अतिशय वेगवान आहेत आणि त्याच्याबरोबर जाण्यात ग्रथालयांना अडचण आहे. या नव्या परिस्थितीस तोंड देण्यासाठी त्यांना आर्थिक आणि प्रशासकीय मदतीची विविध संस्थांकडून गरज आहे. पां रपरिक शैक्षणिक ग्रंथालयांचे एकविसाव्या शतकातील शैक्षणिक ग्रंथालय नाव सार्थ ठरविण्यासाठी ग्रंथालय व्यावसायिकांना व्यवसायातील बदललेली परिस्थिती आत्मसात करून त्या अनुषंगाने कृती करण्याची मानसिकता तयार करावी लागणार आहे.

**संदर्भग्रंथ :**


- बाहेती, एस. आर., ग्रंथालये आणि आधुनिक तंत्रज्ञान, ग्रंथपरिवार, परभणी, में-जुन, 200७.
- आठल्ये, श्रीनिवास., ग्रंथालय संगणकीकरण, ग्रंथपरिवार. परभणी.मे-जुन, 2007.
- हावरे, विनय.पी., ग्रंथालय संगणकीकरणाच्या बाल्यावस्थेतील एक यशस्वी प्रयोग, ज्ञानगंगोत्री,

यचममुवि. नाशिक. मार्च-एप्रिल-मे. 200६

- देवधर, विजय., शैक्षणिक ग्रंथालये आणि गर्थपालन : वाटचाल एकविसाव्या शतकाकडे, ज्ञानगंगोत्री, यचममुवि,नाशिक.